पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक १५.०४.२०१९

# वार्तापत्र

## ‘ऑपरेशन हिंमत’ यशस्वी

➢ **निवडणुकीत मोठया प्रमाणावर नागरिकांचा सहभाग**

गडचिरोली पोलीस दलातर्फे गडचिरोली जिल्हयात ‘सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०१९’ च्या यशस्वीतेसाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या संकल्पनेतुन ‘ऑपरेशन हिंमत’ राबविण्यात आले होते. या माध्यमातुन गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादाबरोबरच दुर्गम अतिदुर्गम भागातील नागरिकांच्या मनात मतदानाविषयची जागृती निर्माण होण्यासाठी तसेच मुक्तीपथाच्या सोबतीने जिल्हयातील दारूबंदी यशस्वी करून ‘दारूमुक्त निवडणुका’ पार पाडण्यासाठी  व्युहरचना तयार करण्यात आली होती. ऑपरेशन हिंमतच्या कृती आराखडयाची योग्य अंमलबजावणी  करत गडचिरोली पोलीस दलाने यंदाच्या सार्वात्रिक लोकसभा निवडणुकीत नक्षलवादी यांच्यावर अंकुश ठेवत निवडणुका यशस्वी करण्यासाठी राबविलेले ऑपरेशन हिंमत फत्ते करण्यात यश मिळवले आहे. याचमुळे सन २०१४ च्या निवडणुकीपेक्षा यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या टक्केवारीत २.५ टक्क्यांची वाढ दिसुन येत आहे.

ऑपरेशन हिंमतच्या माध्यामातुन गडचिरोली पोलीस दलाने गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील ५९१ गावांना ग्रामभेटी देत मतदानाबद्दल व ६१ जनजागरण मेळाव्याच्या माध्यमातुन आदिवासी बांधवांच्या मनामध्ये जगरूकता निर्माण केली. त्याचबरोबर दिनांक ०८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत गडचिरोली शहरात नक्षलवाद विरोधात व मतदार जागृतीसाठी तब्बल १२ हजार महिलांच्या सहभागाने ७ ते ८ किमी पर्यंत साकारलेली ‘बेबी मडावी आदिवासी महिला विकास साखळी चे यशस्वी आयोजन देखील गडचिरोली पोलीस दलाने करत मोठया प्रमाणावर महिलांमध्ये जागृती घडवून आणली. याचाच परिणाम म्हणून महिलांनी मोठया प्रमाणावर घरा बाहेर पडुन आपला मतदानाचा हक्क बजावला.

याचबरोबर मुक्तीपथच्या साथीने गडचिरोली पोलीस दलाने ‘दारूमुक्त निवडणुक’ यशस्वी करत निवडणुक कालावधीत जिल्हयाभरातील विविध पोस्टे, उपपोस्टे, पोमकें येथ मुंबई दारूबंदी कायदयान्वये १४१ गुन्हयांची नोंद करून १० हजार ३४० लिटर दारू व १ कोटी २४ लाख रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविले. त्याचबरोबर ३४१ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली. तसेच ६३१ गुन्हेगारांच्या विरोधात मा. न्यायालयाने काढलेल्या नॉन बेलेबल वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली.

त्याचबरोबर सी-६० चे जवान, जलद प्रतिसाद पथकाचे जवान, विविध पोस्टे, उपपोस्टे, पोमकें येथे तैनात असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी नक्षलवादाविरोधी राबवलेल्या आक्रमक अभियानांमुळे निवडणुकीचे काळात नक्षलवादयांच्या वाढत्या कारवायांवर अंकुश ठेवुन निवणुक प्रक्रिया यशस्वी पार पाडण्यात मोलाची भुमिका बजावली.

दिनांक १० व ११ एप्रिल २०१९ रोजी दोन ठिकाणी झालेल्या भुसुरूंग स्फोटात गडचिरोली पोलीस दल व सिआरपीएफ चे प्रत्येकी ०२ जवान जखमी झाले होते. यानंतर देखील तेथे तैनात असलेल्या जवानांनी शौर्यपुर्ण कामगिरी बजावत मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली. यामुळे या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करत मा. पोलीस अधीक्षक यांनी या मतदान केंद्रावर तैनात असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रोख स्वरूपात बक्षीस जाहीर केले आहे.

आज रोजी मौजा वटेली, गर्देवाडा, पुस्कोटी, वांगेतुरी या दुर्गम भागात मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली असुन या मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याचे नक्षलवादयांचे मनसुबे उधळवुन लावत मोठयाप्रमाणावर मतदान झाले आहे.

मा. पोलीस अधीक्षक यांचे संकल्पनेतुन राबविण्यात आलेले ‘ऑपरेशन हिंमत’ च्या यशस्वीतेचे श्रेय मा. पोलीस अधीक्षक यांनी गडचिरोली पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी त्याचबरोबर सिआरपीएफ, एसआरपीएफ, होमगार्ड व इतर जिल्हयातुन बंदोबस्तासाठी आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या शौर्यपुर्ण कामगिरीचे व मेहनतीचे फळ असल्याचे म्हटले आहे.